राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/ अंमलदार यांना घरबांधणीच्या प्रयोजनासाठी बँकेमार्फत कर्जव्यवस्था करणे.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्र. बीयुडी-०९२४/प्र.क्र.२१६/आस्था-१**

दुसरा मजला, मंत्रालय (मुख्य इमारत),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई -४०० ०३२.
दिनांक- १२.०५.२०२६.

**संदर्भ:-**

१) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक:बियुडी-०११७/ प्र.क्र.२/ आस्था-१, दिनांक १०.०४.२०१७.

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक:बियुडी-०९२२/प्र.क्र.१९६/आस्था-१, दिनांक १४.१०.२०२२.

३) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई या कार्यालयाचे पत्र क्र. पोगृम/वित्त व लेखाशाखा/गृहबांधणीअग्रीम/२०२४-२५/२७६४/२४ दि. २४.११. २०२४.

४) शासन पत्र, गृह विभाग, क्र.बियुडी-०९२४/ प्र.क्र.२१६/ आस्था-१, दि.१.१०.२०२४, दि.८.११.२०२४, दि.२७.७.२०२५, दि.११.९.२०२५, दि.२६.९.२०२५. दि.३०.९.२०२५, दि.२८.१०.२०२५, दि.४.११.२०२५ दि.२१.११.२०२५ दि.२८.११.२०२५ दि. ११.१२. २०२५, दि.२.९.२०२६, दि.१०.४.२०२६.

५) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई या कार्यालयाचे पत्र क्र. पोगृम/वित्त व लेखाशाखा/ गृहबांधणीअग्रीम/२०२४-२५/ २९५०/२४, दि.८.१०.२०२४.

६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.घबाअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम, दिनांक ०१.०३.२०२४.

७) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. पोगृम/ वित्त व लेखाशाखा/गृहबांधणीअग्रीम/ २०२४-२५/ ३६५२/२४, दिनांक ११.१२.२०२४.

८) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. पोगृम/ वित्त व लेखाशाखा/गृहबांधणीअग्रीम/२०२४-२५/३१७/२५, दिनांक ४.२.२०२५.

९) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. पोगृम/ वित्त व लेखाशाखा/गृहबांधणीअग्रीम/ २०२५-२६/ २८५६/२५, दिनांक १७.९.२०२५

१०) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.पोगृम/वित्त व लेखाशाखा/गृहबांधणीअग्रीम/२०२५-२६/३०७८/२५, दिनांक ८.१०.२०२५.

११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.पोगृम/ वित्तवलेखाशाखा/गृहबांधणीअग्रीम/२०२५-२६/३४९३/३४९८/२५,दि.११.११.२०२५.

१२) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई या कार्यालयाचे पत्र क्र.पोगृम/वित्त व लेखाशाखा/गृहबांधणी अग्रीम/२०२५-२६/३५४९/२५, दिनांक १३.११.२०२५.

१३) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई या कार्यालयाचे पत्र क्र.पोगृम/वित्त व लेखाशाखा/गृहबांधणीअग्रीम/ २०२५-२६/ ७६१/२५ दिनांक ०९.०३.२०२६.

१४) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई या कार्यालयाचे पत्र क्र.पोगृम/वित्त व लेखाशाखा/गृहबांधणीअग्रीम/२०२५-२६/ ८६५/२५, दिनांक १६.०३.२०२६.

१५) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई या कार्यालयाचे पत्र क्र.पोगृम/वित्त व लेखाशाखा/गृहबांधणीअग्रीम/२०२५-२६/१२८७/२५, दिनांक १०.०४. २०२६.

**प्रस्तावना.**

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक बियुडी-०११७/प्र.क्र.२/आस्था-१, दिनांक १०.०४.२०१७ व शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक बियुडी-०९२२/प्र.क्र.१९६/आस्था-१, दिनांक १४.१०.२०२२ द्वारे, राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार यांना घरबांधणी अग्रिमाकरिता, बँकांकडून कर्ज घेऊन, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचेमार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. आतापर्यंत पोलीस महासंचालक यांच्या अधिपत्याखालील ८७२८ पोलीस अधिकारी/अंमलदार व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिपत्याखाली १०५३ पोलीस अधिकारी/ अंमलदार, असे एकूण ९७८१ पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचेसाठी या योजनेंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला.

माहे सप्टेंबर २०२३ पासून ते दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचे कार्यालयास प्राप्त झालेल्या घरबांधणी अग्रीमांचा अर्जांच्या अनुषंगाने उक्त योजनेंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय.**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या कार्यालयांतर्गत पोलीस घटक कार्यालयातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्याकरिता, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचे कार्यालयास दिनांक ३१.१२.२०२४ पर्यत प्राप्त झालेल्या एकूण ५४५९ इतक्या घरबांधणी अग्रीमाच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने, दि महाराष्ट्र स्टेट को.ऑ.बॅक लि. यांचेकडून Principal Equated Monthly Instalment (PEMI) अनुसार रु.१७६८.०८ कोटी इतक्या रकमेची, ७.८५ टक्के इतक्या व्याजदराने, कर्ज उभारणी करण्यास खालील अटीच्या अधीन राहून, याद्वारे, शासन मान्यता देण्यात येत आहे,-

१) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांचे कार्यालयाने उपलब्ध निधीच्या मर्यादेत खर्च भागविणे आवश्यक राहील.

२) महामंडळाने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नियतव्ययाच्या मर्यादेत खर्च भागविण्याच्या दृष्टीने नियोजन करावे.

३) सदर योजनेंतर्गत शासनावर पडणारा व्याजाचा भार कमी करण्यासाठी भविष्यात योजनेत आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत व लाभार्थी संख्या मर्यादीत ठेवण्याबाबत विचार करण्यात यावा.

४) लोन धारकांचा लोन इन्शुरन्स/टर्म इन्शुरन्स काढण्यात यावा.

२. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २४६/२०२६ व्यय-८, दिनांक ११.०५.२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र.४१/२०२६, अर्थबळ, दिनांक ११.०५.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१२१२२७१०८५२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by MUGDHA NITIN DHURI
Date: 2026.05.12 12:28:18 +05'30'

**(मु. नि. धुरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
७) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१०) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंब
११) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (अपील व सुरक्षा) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव (गृह-विशेष), यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७) अवर सचिव, व्यय-८/अर्थबळ, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) निवड फाईल, आस्था-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.